JETIR.ORG ISSN: 2349-5162 | ESTD Year : 2014 | Monthly Issue
JOURNAL OF EMERGING TECHNOLOGIES AND INNOVATIVE RESEARCH (JETIR)
An International Scholarly Open Access, Peer-reviewed, Refereed Journal

# विद्यापिठीय आणि महाविद्यालयीन शिक्षकांच्या व्यावसायिक समाधानाचा अभ्यास

**संशोधक**
**कु. रश्मी विनोदराव घोडमारे**
एम.ए (मराठी, अर्थशास्त्र, समाजशास्त्र, राज्यशास्त्र), एम.एड.
**डॉ. वनिता ना. काळे**
प्राध्यापक (शिवाजी शिक्षण महाविद्यालय, अमरावती)

**गोषवारा :–**

शिक्षक हे आपल्या राष्ट्राचे आधारस्तंभ आहेत. विदयार्थ्यांचे ज्ञान आणि कौशल्य विकसित करण्यासाठी शिक्षक महत्त्वाची भूमिका निभवतात. या संशोधनाचे उद्दिष्टय विद्यापिठीय आणि महाविद्यालयीन शिक्षकांच्या व्यावसायिक समाधान पातळीचा अभ्यास करणे हा आहे. माहितीचे संकलन वर्णनात्मक (सर्वेक्षण) पध्दतीने करण्यात आले. या संशोधनासाठी सुगम यादृच्छिक नमुना निवड पध्दतीने 50 विद्यापिठीय आणि 50 महाविद्यालयीन शिक्षकांची निवड करण्यात आली. या संशोधनासाठी साधन म्हणून व्यावसायिक समाधान ( Dr. Kishore Oza And Udham Singh ) या प्रमाणित चाचणीचा वापर करून माहितीचे संकलन करण्यात आले. टी–टेस्ट या साख्यिंकीय तंत्राने माहितीचे विश्लेषण करून निष्कर्ष काढण्यात आले. संशोधनातुन असे आढळून आले की, विद्यापिठीय आणि महाविद्यालयीन शिक्षकांच्या व्यावसायिक समाधान यामध्ये सार्थक फरक नाही.

**मुख्य शब्द :** व्यावसायिक समाधान, विद्यापिठीय आणि महाविद्यालय शिक्षक.

**प्रस्तावना :–**

कोणतेही कार्य करताना व्यक्तीला समाधान मिळणे आवश्यक आहे. शिक्षक तर शिक्षण प्रणालीचा महत्त्वाचा घटक आहे. शिक्षक जर समाधानी असेल तरच त्याच्या कार्यामध्ये सकारात्मक परिणाम दिसून येतो. शिक्षक वर्गात आनंदी असेल तर विदयार्थ्यांना चांगले दर्जात्मक अध्यापन करू शकतात.

व्यावसायिक समाधान :– पूर्ण केलेल्या कामाच्या एकूण कार्यक्षमतेचा एक घटक म्हणजे समाधान, व्यक्तींना कामातून प्रत्यक्षात काय मिळते (पगार, दर्जा, प्रशंसा, इत्यादी) आणि त्याचे अंदाजित परिणाम ज्यामुळे आराम, आनंदाची व्यक्तीनिष्ठ भावना निर्माण होते, जी अनुभवत असलेल्या व्यक्तीद्वारे व्यक्त किंवा वर्णन केली जाऊ शकते, परंतु दुसऱ्या व्यक्तीद्वारे बाहेरून पाहिली जाऊ शकत नाही.( Mathis 1997) व्यावसायिक समाधान ही एक सकारात्मक किंवा आनंददायी भावनिक अवस्था आहे. जी एखादया व्यक्तीच्या स्वःता च्या व्यवसायाबद्दलच्या कौतुकामुळे उदभवते.(लॉक 1976) व्यावसायिक समाधान ही एक मनोवैज्ञानिक स्वभावाची संकल्पना आहे जी लोक त्यांच्या कामात दाखवतात. (शुल्स 1982)

**समस्या विधान :–** "विद्यापिठीय आणि महाविद्यालयीन शिक्षकांच्या व्यावसायिक समाधानाचा अभ्यास"

**गरज व महत्त्व :–**

शिक्षकांचा सहभाग वचनबद्दता पुर्णपणे मनोबल, प्रेरणा आणि व्यावसायिक समाधान यावर अवलंबून असते. 12 देशांमध्ये शिक्षकांच्या व्यावसायिक समाधानाबद्दल सर्वेक्षण करण्यात आले, त्यात असे आढळून आले की, अनुपस्थिती, अनियमितता आणि वचनबध्दतेची कमतरता हे सर्व कामातील कमी समाधानाचे परिणाम आहेत.( Bennell and Akyeampong 2007) शिक्षकांचे व्यावसायिक समाधान हे केवळ शिक्षकांसाठीच नाही तर विदयार्थ्यांसाठी ही तेवढेच महत्त्वाचे आहे. शिक्षणाचा दर्जा हा गुणवत्तेशी संबंधित असतो. शिक्षक हे विदयार्थ्यांच्या भविष्याचे शिल्पकार असतात. जो शिक्षक आपल्या कामात समाधानी असतो तो आपले काम प्रभाविपणे आणि कार्यक्षमतेने करू शकतो. जर शिक्षक तणावाखाली काम करत असतील तर ते त्यांच्या कार्यावर समाधानी असू शकत नाहीत आणि त्याचा व्यावसायावर नकारात्मक परिणाम होतो. त्यामुळे शिक्षकांना त्यांच्या कार्यातून समाधान मिळवण्यासाठी प्रभावित करणारे घटक ओळखणे आवश्यक आहे. जेव्हा शिक्षक त्यांच्या कार्यावर समाधानी असतात तेव्हा अतिरिक्त ऊर्जा विकसित केली जाऊ शकते. त्यातूनच देशाचा जबाबदार नागरिक निर्माण होऊ शकतो. त्यामुळे शिक्षकांच्या समाधानावर अभ्यास करणे गरजेचे आहे.

**संशोधनाची उद्दिष्टये :–**

1. विद्यापिठीय आणि महाविद्यालयीन शिक्षकांच्या व्यावसायिक समाधान पातळीचा अभ्यास करणे.
2. विद्यापिठीय आणि महाविद्यालयीन शिक्षकांच्या व्यावसायिक समाधान याबाबत तुलना करणे.
3. विद्यापिठीय आणि महाविद्यालयीन पुरूष व महिला शिक्षकांच्या व्यावसायिक समाधान याबाबत तुलना करणे.

**परिकल्पना :–**

1. विद्यापिठीय आणि महाविद्यालयीन शिक्षकांच्या व्यावसायिक समाधान यांच्या मध्यमानात सार्थक फरक नसतो.
2. विद्यापिठीय आणि महाविद्यालयीन पुरूष व महिला शिक्षकांच्या व्यावसायिक समाधान यांच्या मध्यमानात सार्थक फरक नसतो.
3. विद्यापिठीय पुरूष व महिला शिक्षकांच्या व्यावसायिक समाधान यांच्या मध्यमानात सार्थक फरक नसतो.
4. महाविद्यालयीन पुरूष व महिला शिक्षकांच्या व्यावसायिक समाधान यांच्या मध्यमानात सार्थक फरक नसतो.

**गृहितके :–**

1. व्यावसायिक तणावामुळे महाविद्यालयीन शिक्षक समाधानी नसतात.
2. व्यावसायिक तणावाचा परिणाम समाधानावर होत असतो.
3. शिक्षकांवर अध्यापना व्यतिरिक्त इतर कामे लादली जातात.
4. शिक्षकांना पुरेशा सवलती दिल्या जात नाही.
5. महिलापेक्षा पुरूष शिक्षक अधिक व्यावसायिक समाधानी असतात.

**व्याप्ती :–**

1. प्रस्तुत संशोधनात अमरावती विदयापीठां अर्तंगत येणाऱ्या विद्यापिठीय आणि महाविद्यालयीन शिक्षकांचा समावेश करण्यात आला.
2. प्रस्तुत संशोधनात अमरावती विदयापीठां अर्तंगत येणाऱ्या विद्यापिठीय आणि महाविद्यालयीन शिक्षकांच्या व्यावसायिक समाधानाचाच अभ्यास करण्यात आला.

**मर्यादा :–**

1. प्रस्तुत संशोधनात अमरावती विदयापीठां अर्तंगत येणाऱ्या विद्यापिठीय आणि महाविद्यालयीन शिक्षकांपर्यंतच मर्यादित आहे.
2. विद्यापिठीय आणि महाविद्यालयीन शिक्षकांच्या व्यावसायिक समाधाच्या अभ्यासापुरतेच मर्यादित आहे.

**संबंधित साहित्याचा व संशोधनाचा आढावा**

**1-** **Lipin Raj and Dr. Josheena Jose (March 2019),** International Journal in Management and Social Science (Volume 07 Issue 03), ISSN 2321&1784, "A study on the job satisfaction and institutional commitment among school teachers in Kerala with special reference to Malappuram District" **उद्दिष्टये :–** केरळमधील शिक्षकांच्या व्यावसायिक समाधानावर परिणाम करणाऱ्या घटकांचा अभ्यास करणे. या संशोधनासाठी वर्णनात्मक पध्दतीचा वापर करण्यात आला. **निष्कर्ष :–** वेतन, पदोन्नती, पर्यवेक्षण, बक्षिसे, समवयस्क गट, कामाचे स्वरूप आणि संप्रेषण यासारख्या व्यावसायिक समाधानाच्या विविध घटकांमध्ये शिक्षकांच्या समाधानाची पातळी वेगवेगळया व्यवस्थापन प्रणालीमध्ये सार्थक फरक दर्शविते.

**2-** **Helen Catalina Rabunal Leon, Enaidy Reynosa Navarro And Lindon Vela Melendez (2021),** Cypriot Journal of Educational Science (Volume 16 Issue 6) 3317&3328, " Job Satisfaction factors in secondary school teachers, public and private institutions in a Peruvian Region" **उद्दिष्टये :–** yk- fycVZaM izns'k] is: 2020 सार्वजनिक आणि खाजगी शैक्षणिक संस्थामधील माध्यमिक शाळांमधील व्यावसायिक समाधानाच्या घटकांमधील फरक निश्चित करणे. या संशोधनासाठी वर्णनात्मक पध्दतीचा वापर करण्यात आला. **निष्कर्ष :–** 1. सार्वजनिक आणि खाजगी शैक्षणिक संस्थामधील माध्यमिक शाळेतील 50.5 शिक्षक व्यवसायाबाबत असमाधानी आढळून आले. 2. दोन्ही प्रकारच्या व्यवस्थापनामध्ये व्यावसायिक समाधानाच्या निर्धारित घटकांमध्ये सार्थक फरक आढळून आले.

**3-** **Pro. Dr. Shivami Bhatnagar and Anoop Shukla (September 2022),** International Journal of Research Publication and Reviews (Volume 3 Issue 9), ISSN 2582&7421, "A Review of Literature on Teacher's Job Satisfaction" शिक्षकाला त्यांच्या नोकरीत समाधान असणे अत्यंत आवश्यक आहे, तरच तो आपल्या विदयार्थ्यांचे कल्याण करू शकतो. त्यामुळे शिक्षकांनीही त्यांच्यात समाधानी राहण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे. शिक्षकांनी त्यांच्या कामातील समाधान सुधारण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. शिक्षक वेळेनुसार स्वतःला अपडेट ठेवतात. महाविदयालयाचे वातावरण सौहार्दपूर्ण व गुणवत्तापुर्ण ठेवण्यासाठी शिक्षकांनी सहकार्य करावे, महाविदयालयातील उपक्रम व कार्यक्रमात शिक्षकांनी सहभागी व्हावे. शिक्षकांनी त्यांच्या क्षमतेनुसार ध्येय व उद्दिष्टये ठरवावीत. शिक्षकांनी नेहमी पुढे राहण्याचा प्रयत्न केला पाहिजे. शिक्षकांनी सहकाऱ्यांशी सहकार्याची वृत्ती ठेवावी.

**4-** **Muddarage Lakshmi Hemamala Sumanasena and Fareed Mohamad Nawastheen (Octomber 2022),** MJSSH Online (Volume 6 Issue 4), " Teacher Job Satisfaction : A Review of Literature" पृष्ठ क. 1–12. कोणत्याही देशातील शिक्षणाच्या तथापि, शिक्षकांमधील नोकरीच्या समाधानावर अनेक घटक प्रभाव टाकतात. **उद्दिष्टये :–** शिक्षकांच्या व्यावसायिक समाधानाबद्दल श्रीलंकेत केलेल्या अभ्यासाचा शोध घेणे. ऐतिहासिक अभ्यास पध्दतीचा वापर करण्यात आला. **निष्कर्ष :–** व्यावसायिक समाधानाच्या अभ्यासाचा अभाव असल्याचे आढळून आले.

**संशोधनाची कार्यपध्दती**

प्रस्तुत संशोधनात हे वर्तमान काळातील असल्यामुळे तथ्य संकलन करुन संशोधन करण्यासाठी सर्वेक्षण पध्दतीचा अवलंब करण्यात आला आहे. प्रस्तुत संशोधनात अमरावती विदयापीठां अर्तंगत येणाऱ्या विद्यापिठीय आणि महाविद्यालयीन शिक्षकांचा समावेश जनसंख्येत करण्यात आला आहे. प्रस्तुत संशोधनात विद्यापिठीय आणि महाविदयालयीन शिक्षकांच्या व्यावसायिक समाधान याचा तुलनात्मक अभ्यास करावयाचा असल्याने विद्यापिठीय शिक्षक 50 (पुरूष 25 आणि महिला 25) व महाविदयालयीन शिक्षक 50(पुरूष 25 आणि महिला 25) अशा एकूण 100 व्यक्तींची नमुना म्हणून निवड करण्यात आली आहे. नमुन्याची निवड सुगम यादृच्छिक नमुना निवड पध्दतीने करण्यात आली. प्रस्तुत संशोधनात व्यावसायिक समाधान याचा अभ्यास असल्यामुळे विद्यापिठीय आणि महाविद्यालयीन शिक्षकांना लागू होण्याऱ्या प्रमाणीत चाचणी व्यावसायिक समाधान (Dr. Kishore Oza And Udham Singh) या साधनांचा वापर करण्यात आला. प्रस्तुत संशोधनाचे स्वरुप तुलनात्मक असल्याने त्यात विद्यापिठीय आणि महाविदयालयीन शिक्षकांच्या व्यावसायिक समाधान या चलांची तुलना करण्यासाठी टी टेस्ट या सांख्यिकीय तंत्राची निवड करण्यात आली होती.

**परिकल्पना पडताळणी**

1. विद्यापिठीय आणि महाविद्यालयीन शिक्षकांच्या व्यावसायिक समाधान यांच्या मध्यमानात फरक दर्शविणारी सारणी

| शिक्षक | शिक्षकांची संख्या | मध्यमान | प्रमाण विचलन | प्रमाण त्रुटी | प्राप्त टी मुल्य | सार्थकता स्तर | सारणी टी मुल्य | सार्थकता |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| विद्यापिठीय | 50 | 33.22 | 3.25 | 0.50 | 0.52 | 0.05 | 1.97 | असार्थक |
| महाविद्यालयीन | 50 | 32.93 | 3.85 | | | 0.01 | 2.60 | असार्थक |

2. पुरूष व महिला शिक्षकांच्या व्यावसायिक समाधान यांच्या मध्यमानात फरक दर्शविणारी सारणी

| विद्यापिठीय आणि महाविद्यालयीन | शिक्षकांची संख्या | मध्यमान | प्रमाण विचलन | प्रमाण त्रुटी | प्राप्त टी मुल्य | सार्थकता स्तर | सारणी टी मुल्य | सार्थकता |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पुरूष | 50 | 29.89 | 2.89 | 0.45 | 0.79 | 0.05 | 1.97 | असार्थक |
| महिला | 50 | 25.74 | 2.84 | | | 0.01 | 2.60 | असार्थक |

3. विद्यापिठीय पुरूष व महिला शिक्षकांच्या व्यावसायिक समाधान यांच्या मध्यमानात फरक दर्शविणारी सारणी

| विद्यापिठीय शिक्षक | शिक्षकांची संख्या | मध्यमान | प्रमाण विचलन | प्रमाण त्रुटी | प्राप्त टी मुल्य | सार्थकता स्तर | सारणी टी मुल्य | सार्थकता |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पुरूष | 25 | 21.55 | 2.30 | 0.37 | 0.89 | 0.05 | 1.97 | असार्थक |
| महिला | 25 | 22.85 | 2.78 | | | 0.01 | 2.60 | असार्थक |

4. महाविद्यालयीन पुरूष व महिला शिक्षकांच्या व्यावसायिक समाधान यांच्या मध्यमानात फरक दर्शविणारी सारणी

| महाविद्यालयीन शिक्षक | शिक्षकांची संख्या | मध्यमान | प्रमाण विचलन | प्रमाण त्रुटी | प्राप्त टी मुल्य | सार्थकता स्तर | सारणी टी मुल्य | सार्थकता |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पुरूष | 25 | 22.01 | 3.66 | 0.45 | 0.88 | 0.05 | 1.97 | असार्थक |
| महिला | 25 | 20.99 | 2.57 | | | 0.01 | 2.60 | असार्थक |

**निष्कर्ष :–**

1. विद्यापिठीय आणि महाविद्यालयीन शिक्षकांच्या व्यावसायिक समाधान यांच्या मध्यमानात सार्थक फरक नसल्याचे आढळून आले.
2. विद्यापिठीय आणि महाविद्यालयीन पुरूष व महिला शिक्षकांच्या व्यावसायिक समाधान यांच्या मध्यमानात सार्थक फरक नसल्याचे आढळून आले.
3. विद्यापिठीय पुरूष व महिला शिक्षकांच्या व्यावसायिक समाधान यांच्या मध्यमानात सार्थक फरक नसल्याचे आढळून आले.
4. महाविद्यालयीन पुरूष व महिला शिक्षकांच्या व्यावसायिक समाधान यांच्या मध्यमानात सार्थक फरक नसल्याचे आढळून आले.

या संशोधनावरून असे आढळून आले की, विद्यापिठीय आणि महाविद्यालयीन शिक्षकांच्या व्यावसायिक समाधानाच्या पातळीची तुलना केली असता त्यांच्या समाधानाच्या पातळीमध्ये सार्थक फरक नाही. लिगांच्या सदर्भांत देखिल सार्थक फरक नाही. व्यावसायिक समाधान वाढविण्यासाठी शिक्षकांना संघटनात्मक पाठबळ देणे अत्यंत महत्त्वाचे आहे. शिक्षकांच्या व्यावसायिक समाधानासाठी सर्वोतपरी प्रयत्न केले पाहीजे. शिक्षकांच्या विकासाची संधी, कार्यशाळा, परिसंवाद, पारितोषिके, प्रशिक्षणे, याद्वारे समाधान मिळु शकते.

**संदर्भ**


1. कॅजबर्ग, एएल (1977), ''कामाची मूल्ये आणि व्यावसायिक बक्षीसः नोकरीच्या समाधानाचा सिध्दांत'', अमेरिकन समाजशास्त्रीय पुनरावलोकन, पृष्ठ क्रमांक. 124–143.
2. मेहता, एस.(2012), ''शिक्षकांमध्ये कामाचे समाधान'', आय यु पी जर्नल ऑफ ऑर्गनायझेशनल बिहेवियर, 11(2), पृष्ठ क्रमांक. 54.
3. लॉक, इए (1976), ''व्यावसायिक समाधानाचे स्वरूप आणि कारणे'', एमडी डयुनेट (एड.), हॅडबुक ऑफ इंडस्टियल ॲड ऑर्गनायझेशनल सायकोलॉजी,शिकागोः रॅडमॅकनॅली.